# कार्यालय
# ग्रामपंचायत पांजरी (बुजुर्ग)
# पंचायत समिती नागपूर, जिल्हा परिषद नागपूर

..............................................................................................................................

## ग्रा .पं. पांजरी (बुजुर्ग) अंतर्गत खाजगी टॅंकरव्दारे आवश्यकते नुसार शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता ई-निविदा सुचना क्र. १

सन -२६/२७

यादूवारे सर्व अधिकृत पुरवठादारकास सुचित करण्यात येते की, ग्रामपंचाय पांजरी (बुजुर्ग) ला सन **२०२६/२७** मध्ये खाजगी टॅंकरव्दारे आवश्यकते नुसार शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता_ई-निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक पुरवठादारानी आपले दर सोबतच्या दर पत्रकामध्ये १७/०४/२०२५ रोजी सायंकाळी **५**.०० वाजे पर्यंत **http//mahatenders.gov.in** या वेब साईड वर सादर कराव्या. उशिरा आलेल्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

<u>अटी व शर्ती</u>

१. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा व्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय अज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना सुध्दी पत्रके इत्यादीची माहिती **http//mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२. वरील कामाचे निविदा पत्रके **http//mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर निविदा पत्रके अटी व शर्ती ई-संकेत स्थळावर दि.**१०/०४/२०२६ सायंकाळी ५.००** वाजेपासून ते १७/०४/**२०२५** सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत अधिग्रहित (Download) करता येतील.

१) गाडीचे नोंदणी प्रमाणपत्र (RC BOOK)

२) Pan card,Aadharcards

३) अन्न.नागरी पुरवठा व ग्राहक स्वरक्षण विभाग अंतर्गत पडताळणी प्रमाणपत्र (क्षमता प्रमाणपत्र) हे प्रमाणपत्र आवश्यक आहे असल्यास त्याच पुरवठा धारकाची निविदा उघडण्यात येईल नसल्यास उघडता येणार नाही .

४) निविदा प्रपत्रातील सविस्तर निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती पुरवठादारकास बंधनकारक राहतील.

५) उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिल्या जाणार नाही.

३. ग्रामपंचायतला शासकीय निधी उपलब्ध झाल्यानंतरच कामाच्या प्रमाणात देयके देण्यात येईल. त्याचप्रमाणे सेवा कर व टी.डी.एस कपात तसेच इतर कपात शासनाच्या नियमानुसार देयकातून कपात केल्या जाईल.

४. मंजूर निविदा ३१ मार्च २०२७ पर्यंत विधीग्राहय राहील.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्र. १ (तांत्रीक लिफाफा) शक्यतो दि २०/०४/२६ रोजी सकाळी १०.०० वा. **http//mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर ग्रामपंचायत कार्यालय पांजरी (बुजुर्ग) येथे उघडण्यात येईल.

६. मंजूर निविदा धारकाकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी ग्रा.पं.चे. नावे ग्रा.पं. पांजरी (बुजुर्ग) येथे देय असलेल्या धनाकर्षाच्या स्वरूपात राष्ट्रीयकृत/शेडूल बॅंक/जिल्हा मध्यवर्ती बॅंकेत घेतली जाईल. उर्वरित अनामत रक्कम देयकाकडून कपात केली जाईल.

७. निविदा बाबत कोणत्याही मार्गदर्शक सुचना सुध्दी पत्रक अथवा इतर माहिती **http//mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

८. सदर कामाच्या ०३ योग्य निविदा प्राप्त झाल्याशिवाय उघडण्यात येणार नाही.

९. पाणी पुरावठाधारकातर्फे कोणत्याही शर्ती व अटी घालून सादर केलेली ई-निविदा स्विकारल्या जाणार नाही.

१०. निविदा मंजूर झाल्यास रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून दयावा लागेल.

**१. ग्रा.पं. ई-निविदा फी व अनामत रक्कम डी.डी. स्वरुपात असून डी.डी व अनामत रक्कम ग्रा.पं ला जमा करून नमुना-७ पावती व डी .डी व अनामत रक्कम ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावे लागेल . नमुना -७ ची पावती ई-निविदा भरतांना ऑनलाईन जोडावे ज्या पुरवठा धारकांनी नमुना पावती न जोडल्यास त्यांची ई-निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाही.**

**२. ई-निविदा फी व अनामत रक्कम वॉटर टँकर करिता निविदा फी ५०००/ व अनामत रक्कम १००००/-(दहा हजार ) निविदा फी ना परतावा.**

**३. टीप :-ई –निविदा फॉर्म फी परत मिळणार नाही तसेच ज्याची निविदा ना मंजूर झाल्यास फक्त अनामत रक्कम परत करण्यात येईल.**

**अ. निविदा फी – डी.डी व अनामत रक्कम दिनांक १६/०४/२०२६ ला दुपारी ४.०० वाजेपर्यंत ग्रा.पं कार्यालय मध्ये जमा करून नमुना -७ ची पावती घेऊन निविदा भरताना अपलोड करावे अन्यथा निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाही**

११. खाजगी टँकरचे प्रति १००० लि. प्रमाणे पाण्यासह दर सादर करण्यात यावे.

१२. नमूद केलेल्या दरामध्ये कोणतीही प्रकारची सुधारणा करून मिळणार नाही. तसेच खाजगी टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्यास सदर पुरवठाधारकास पुढील ५ वर्षासाठी काळया यादीत टाकण्यात येईल.

१३. नमूद केलेले दर शासकीय दराशी निगडीत असावे किंवा त्यापेक्षा कमी असावे. जास्त असल्यास त्या निविदाधारकाची निविदा ग्राहय धरल्या जाणार नाही.

१४. निविदा धारकांना कोणतीही पुर्वसुचना/कारण न दर्शविता १ अथवा सर्व निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.

१५. टँकर क्षमता ४००० लिटर पेक्षा कमी क्षमतेचे निविदा स्विकारल्या जाणार नाही.

१६. निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा धारकास टँकरवर ''महाराष्ट्र शासन पाणी पुरवठाः पाणी भरण्याचे ठिकाण व पाणी पुरवठयाचे ठिकाणे'' अशा माहितीचा बोर्ड ठळक अक्षरात टँकरच्या दर्शनी भागावर लावावा लागेल. असे न आढळल्यास रूपये ५००/- इतका दंड आकारण्यात येईल.

१७. पाणी पुरवठाकामी उपलब्ध करून देण्यात येणा-या प्रत्येक टँकरवर जी.पी.एस. प्रणाली निविदाधारकाने स्वःखर्चाने बसविणे बंधनकारक राहील. सदर यंत्रणा बसविणे व त्याची देखभाल दुरूस्ती इ.चा खर्च निविदाधारक यांनी स्वतः करावा लागेल.

१८. टँकर मधील बिघाड, दुरूस्ती, अपघात, चालक पगार, कागदपत्राची पुर्तता व इतर टँकर संबंधित उपस्थित होणा-या सर्व बाबींची जबाबदारी ही टँकर धारकाची असेल.

१९. शासकीय आदेशाप्रमाणे मंजूर टँकरची संख्या व फे-या निश्चीत केल्या जाईल. यामध्ये ग्रामपंचायतला कुठलेही फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही.

२०. वाहन टाकीसह सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

२१. शुदध पाणी पुरवठा करणे/कोणतीही साथरोग होणार नाही याची जबाबदारी टँकर मालकाची राहील.

२२. पाणी टँकरची क्षमता (लिटर) प्रमाणपत्र सादर करावे लागेल त्याशिवाय देयके देता येणार नाही.

२३. पाणी पुरवठा मागणी नुसार त्वरीत करावा लागेल.

२४. टँकरचे वाहन चालक हे प्रशिक्षीत, कार्यक्षम कुशल व अनुभवी ठेवावेत. तसेच त्यांचाकडे जड वाहन चालविणेचा परवाना आवश्यक आहे.

२५. टँकरवर काम करणा-या कर्मचा-याचे (अधिकृत वाहन चालक व मदतनिस) वेतन व भत्ते तसेच टँकरसाठी लागणारे तेल, इंधन व इतर खर्च वाहन मालकानेच अदा करावयाचे आहे. यासाठी निविदाधारकानी स्वतंत्र व्यवस्था करावी.

२६. पाणी वाहतुक कालावधी दरम्यान टँकरचा देखभाल व दुरूस्ती खर्च हा टँकर मालकास करावा लागेल. टँकर ना दुरूस्त झाल्यास त्याची दुरूस्ती तात्काळ करण्यात येवून पाणी वाहतुकीस कुठल्याही प्रकारचा खंड पडता कामा नये. नादुस्त टँकर जर ताबडतोब दुरूस्त होणार नसेल तर त्वरीत पर्यायी टँकरची व्यवस्था यशस्वी निविदाधारकास करावी लागेल. २४ तासात पर्यायी टँकर उपलब्ध करून न दिल्यास प्रतिदिन प्रति टँकर रू. २०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार ग्रामपंचायतला राहील.

२७.टॅंकरचे लॉगबुक एक प्रतीत ठेवावे लागेल. लॉगबुक सर्व नोंदीची अद्यावत ठेवणेची जबाबदारी संबंधित टॅंकर चालकाची राहील. टॅंकरचे लॉगबुक गहाळ झाल्यास त्या कालावधीचे बिल अदा केले जाणार नाही.

२८. निविदेबाबत मंजूर/नामंजूर नियमात बदल किंवा सुधारण किंवा इतर बाबींचे सर्व अधिकार ग्रा.पं. नी राखून ठेवले आहेत.

२९.ज्या कोणत्या विहिरीवरून टॅंकरव्दारे पाणी पुरवठा होत असेल त्या विहिर मालकास पाण्याचा मोबदला देण्याची जबाबदारी ही निविदा धारकाची राहील.

३०.**शासकीय दराप्रमाणे पाणीपुरवठा करावयाचा टॅंकर**चा दर प्रती १००० लिटर २७० /-(शासकीय दर ) असल्याने शासकीय दरापेक्षा जास्त किमतीच्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही .

३१.पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

३२.पाणी निर्जतुकीकरण करण्याची काम आपणास करावे लागेल व शुदध पाणी पुरवठा करावा लागेल.

३३.टॅंकर धारकाने कोणत्याही प्रकारची तक्रारी येणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा ग्रामपंचायत कडून टॅंकर बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. कुठलाही उजर ऐकला जाणार नाही.

३४.सरपंच/सचिव यांचे निर्देषानुसार परिसरात पाणी पुरवठा करावे लागेल.

35- निविदेतील अटी व शर्ती http//mahatenders.gov.in या संकेतस्थाळावर उपलब्ध आहे.

**-स्वा-**
**प्रशासक /ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा .पं. पांजरी (बुजुर्ग)**
**पं.स .नागपूर**

Signature Not Verified
Digitally signed by Manik Antaram Lanjewar
Date: 2026.04.10 17:09:59 IST
Location: Maharashtra-MH